<u>विषेश दिवाणी दावा.क्रं.५७९/२०११ मधील नि.५ वरील आदेश</u>
(घोषित दिनांक :०४/०१/२०१४)

श्रीम.आनंदी आत्माराम घरत वगैरे .... वादी
वि.
श्री.अनंत बाळाराम पाटील वगैरे .... प्रतिवादी

वादीने दिवाणी आचार संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे तूर्तातूर्त मनाईहुकूम मिळणेकरीता हा अर्ज केला आहे-

२) दाव्याची थोडक्यात हकिगत अशी की-

मौजे गव्हाण, ता.पनवेल येथील जमीन स.क्र.२४, ३४, ३९, ४०, ५५ या मिळकती श्री.श्रावण बाळया पाटील यांचे मालकीच्या होत्या व सन १९६५ साली त्यांचे मृत्यूपश्चात सदर मिळकती त्यांची पत्नी व मुले यांचेकडे आल्या व त्यांचा वडील मुलगा म्हणून बाळाराम श्रावण यांचे नावाची नोंद झाली. या हिंदू एकत्र कुटूंबाच्या अविभाजित स्वरूपाच्या मिळकती होत्या. संपादनापूर्वी त्यांचे वाटप झालेले नव्हते. सदर मिळकती संपादन झाल्यानंतर त्याची नुकसानभरपाई वादी क्र.१ व वादी क्र.२ ते ८ यांची आई श्रीमती सीताबाई यांनी प्रत्येकी <u>१/७</u> हिश्श्याने स्विकारली आहे. शासनाच्या योजनेअंतर्गत मिळकत संपादीत झाल्यानंतर पूर्नवसनाकरीता जमीन मालकाना १२.५ टक्के भूखंड देण्याची योजना अमलात आली. त्याप्रमाणे ४०० चौ.मीटरचा भूखंड क्र.६८ सेक्टर १० ब उलवे १ ई येथे इरादीत करण्यात आला आहे (यापुढे सदर मिळकतीस 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येईल) इतर भूखंडांचा वादींकडे तपशील नाही.

३) दावा मिळकतीत वादींचा अविभाजित हिस्सा असतानाही प्रतिवादी क्रं.१ ते ३, ९ व ११ यांनी दावा मिळकत तबदील करण्याबाबत व्यवहार केल्याचे वादीना समजले. वादीनी दावा मिळकतीत त्यांचा हिस्सा असल्याचे प्रतिवादींना तसेच सिडकोला कळविले. परंतू त्यांचा हक्क हितसंबंध डावलण्याचा प्रतिवादींचा इरादा आहे. वादींचा हिस्सा असताना दावा मिळकत विक्रीचे व्यवहार झाल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होईल म्हणून प्रतिवादी क्रं.१ ते ३ व ११ यानीं कोणत्याही ति-हाईत इसमाबरोबर व्यवहार करू नये, अशी वादीने विनंती केली आहे.

४) प्रतिवादी कं.१ ते ७ ची कैफियत नि.२१ वर दाखल आहे. मूळ पुरूष श्रावण बाळया पाटील हे सन १९४८ साली मयत झाल्याचे प्रतिवादींनी नमूद केले आहे. त्यावेळी हिंदू वारसा कायदा अस्तित्वात नसल्याने मुलींना हक्क नव्हता. श्रावण बाळया पाटील यांचे मिळकतीत त्यांचे तीन मुलगे बाळाराम, हिरा व लक्ष्मण यांचा १/३ हिस्सा होता. त्यांचे मुलींना कोणताही कायदेशीर हक्क नव्हता. वादीने नमूद केलेल्या मिळकतीपैकी स.५५ ची मिळकत पदीबाई बाळाराम पाटील हिला तिचे वडीलांनी बक्षिस म्हणून दिली होती. परंतू तशी नोंद करण्याचे राहून गेल्याने ३२(ग) नुसार तिची किंमत ठरविण्यात आली. ती बाळाराम यांचा मुलगा अनंत यांने भरलेली आहे. सदर जमीनीशी वादी व इतर प्रतिवादींचा कोणताही संबंध नाही. वादींना हिस्सा होता व त्यानी नुकसानभरपाई स्विकारली हे या प्रतिवादीनी नाकारले आहे. दावा कलम १(१) ते (६) मधील संपादीत जमीनी बाळाराम श्रावण पाटील यांच्या तोंडी वाटपाने वैयक्तिक मालकी व ताबा वहीवाटीचे होत्या म्हणून त्यांचे नावे निवाडे होउन त्यानी एकटयाने नुकसानभरपाई स्विकारली आहे. तसेच, दावा कलम १(७) मधील जमीन ही तोंडी वाटपाने लक्ष्मण श्रावण पाटील यांचे मालकी व ताबेकब्जात होती त्याचा निवाडा त्यांचे नावे होउन त्यानीच नुकसानभरपाई स्विकारली आहे. दावा कलम १(८) व (९) मधील जमीनी पदुबाई हिला मिळालेली असल्यामुळे बाळाराम पाटील यांचे नावे झाली व नंतर त्यांचा मुलगा अनंत याचे नावे निवाडा झाला. तसेच, कलम १ (१०) मधील जमीन बाळारामचे मालकीची असल्यामुळे त्याचेच नावे निवाडा होउन त्यानेच नुकसानभरपाई स्विकारली आहे. तसेच, दावा कलम १(१२) मधील जमीन पांडुरंग पुंडलीक घरत यांचे नावे असून त्यांचे नावे निवाडा होउन त्याने रक्कम स्विकारली आहे. दावा मिळकतीशी वादी अगर इतर प्रतिवादींचा कोणताही हितसंबंध नाही. श्रावण पाटील यांचे मुलाचे एकत्र कुटूंब नव्हते त्यामुळे तो एकत्र कुटूंबाचा पुढारी देखील नव्हता. वादीना वारसाहक्क नसल्याने त्याना प्रथमदर्शनी केस नसल्याने मनाईहुकूम दिल्यास प्रतिवादींचे पैशाचे स्वरूपात न भरून येणारे नुकसान होईल म्हणून दावा व अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

५) प्रतिवादी कं.१ ते ३ व ७ ने नि.६५ वर अतिरिक्त कैफियत दाखल

केली आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की केवळ सहानुभूती म्हणून त्यांचे प्रत्येक मुलीला रूपये १ लाख देण्यात आले. वादी अगर तिच्या बहीणी यांनी केव्हाही दावा मिळकतीवर हक्क सांगितला नव्हता. प्रतिवादी क्रं.८ व ९ यांनी वादीचे वारसांना हाताशी धरून पैसे उकळण्याकरीता खोटा दावा दाखल केला आहे.

६) प्रतिवादी क्र.१० ने नि.१३१ प्रमाणे कैफियत दाखल केली आहे. वादीना श्रावण बाळया पाटील यांचे एकत्र कुटूंबाचे मिळकतीमध्ये हक्क प्राप्त होत नाहीत. पांडुरंग पुंडलिक घरत यांचे नावे काही निवाडे असताना त्याना पक्षकार केले नाही. वादीनी दिलेली वंशावळ चुकीची व अपूर्ण आहे. मूळ पुरूष श्रावण बाळया पाटील हे सन १९४८ साली मयत झाले आहेत. हिंदु वारसा कायदा १९५६ अमलात आल्यानंतरच मुलींना वडिलोपार्जित मिळकतीमध्ये हक्क प्राप्त झाला. श्रावण बाळया त्यापूर्वी मयत झाल्यामुळे मुलींना हक्क नव्हता. चौकशी अर्ज क्रं.११६/२००० हा केवळ हिरा व बाळाराम यांचे कायदेशीर वारस ठरवून मिळण्याकरीता होता. त्यामुळे वादी क्रं.१ ने मिळविलेला वारस दाखला चुकीचा आहे. श्रावण बाळया यांचे मृत्यूपश्चात बाळाराम हेच एकत्र कुटूंबाचे पुरूष म्हणून व्यवहार पहात होते व ते त्यांचे वारस आहेत. दावा मिळकत संपादीत झाल्यानंतर सिडकोकडून मिळालेली नुकसान भरपाईची रक्कम आपसात वाटून घेतली आहे. दावा मिळकतीची भूसंपादनाची प्रक्रिया चालू असताना वादीनी कोणतीही हरकत घेतली नव्हती, म्हणून अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

७) प्रतिवादी क्र.११ ने नि.३८ वर कैफियत दाखल करून प्रतिवादी क्रं.१ ते ७ यांचे वरीलप्रमाणेच म्हणणे मांडले आहे.

८) वादी व प्रतिवादींचे कथनांवरून हया अर्जाचे निकालासाठी खालील मुद्दे माझे विचाराधीन आले. त्या प्रत्येक मुदयावरील माझा निष्कर्ष व

त्याबद्‌दलची कारणमिमांसा पुढे दिली आहे-

| **मुद्‌दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १) वादीने त्याचेकडे प्रथमदर्शनी सबळ केस असल्याचे शाबीत केले काय? | नाही |
| २) सोयीचा तराजू वादीचे बाजूने झुकल्याचे त्याने शाबीत केले काय? | नाही |
| ३) वादीचे लाभात मनाईहुकूम न दिल्यास त्याचे अपरिमित नुकसान होत असल्याचे वादीने शाबीत केले काय? | नाही |
| ४) हुकूम काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा.

**मुद्‌दा क.१ व २ बाबत** :-

९) दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

१०) वादीचे वकीलांनी वादी क.१ ही सह हिस्सेदार असल्यामुळे तिचा दावा मिळकतीत १/७ हिस्सा आहे, असे सांगितले आहे. तसेच, २ फेरफार नोंदी असल्यामुळे कोणती फेरफारची नोंद बरोबर आहे, याबाबत संभ्रम आहे. जर सिडकोने प्रतिवादीना भूखंड दिले तर दावा निरर्थक होईल व वादींचे अपरिमित नुकसान होईल. वादीनी दावा मिळकतीच्या ७/१२ उता-यांच्या प्रती, तसेच, निवाडयाच्या प्रती दाखल केल्या आहेत. त्यामध्ये दावा मिळकती बाळाराम श्रावण, अनंत बाळाराम, लक्ष्मण, पदीबाई वगैरे यांचे नावे आहेत. कोणत्याही निवाडयामध्ये वादींचे नाव नाही अथवा त्यानी हरकत घेतल्याचे नमूद नाही. वादींनी हक्काचे पत्रक दिनांक १०/०५/१९७४ रोजीचे नोंद क्रं.३८५१ दाखल केली आहे. हि नोंद दिनांक १०/०५/१९७४ रोजीची आहे. श्रावण बाळा पाटील हे ८ वर्षापूर्वी मयत असून त्यांचे मुलगे व मुली वारस आहेत, अशी नोंद आहे.

तसेच, दिनांक २२/१०/१९८५ रोजी शांताबाई श्राावण पाटील मयत असून त्यांचे मुलांची वारस म्हणून नोंद आहे. त्यांचे मुली म्हणजेच वादींची आईचा देखील समावेश आहे. वादींतर्फे प्रथम सिडको कार्यालयात दिनांक १४/०५/२०११ रोजीची नोटीस देण्यात आली आहे. मिळकत संपादनापासून ते दावा दाखल करेपर्यंत नोटीसपूर्वी सिडको कार्यालयात भूखंडाविषयी नुकसान भरपाईकरीता हरकत नोंद केल्याची नोंद नाही.

११) प्रतिवादी क्रं.१ ते ७ यांचे वकीलांनी श्रावण बाळया हे सन १९४८ साली मयत झाले आहेत, हे सांगून त्यानी दाखल केलेल्या हक्काचे पत्रकाकडे लक्ष वेधले. सदर हक्काचे पत्रक अनु.१५२७ असून दिनांक १७/११/१९४८ रोजी नोंदलेले आहे. त्यामध्ये श्रावण बाळया हे दिनांक ११/०९/१९४८ रोजी मयत झाले व एकत्र कुटूंबाचे पुरूष वडील बाळाराम यांची नोंद घेतली आहे. तसेच, त्यानी कुळ कायदयाप्रमाणे बाळाराम यांनी पैसे भरलेची पावती दिनांक १४/०१/१९५५ व दावा मिळकतीचे सन १९५७ ते १९७७ पर्यंतच्या बाळाराम यांनी धारा भरल्याच्या पावत्या, त्यांना सन १९५९ साली आलेली नोटीस इत्यादी दाखल केले आहेत. तसेच, इतर जमीनी हया बाळाराम यांच्या स्वकष्टार्जित असून जमीन संपादीत झाली त्यावेळी कोणीही हरकत घेतली नाही, असे सांगितले. तेव्हा वारसाहक्क दाखला मिळाल्यामुळे वादीना जमीनीत अधिकार प्राप्त होत नाहीत.

१२) सन १९४८ साली श्रावण बाळया यांचे मृत्यूचे नोंद झालेली असताना सन १९७४ साली दुसरी नोंद घेण्याची आवश्यता नव्हती. पहिली नोंद चुकीची असल्यास वादीनी ती आव्हानित करावयास हवी होती. हिदू वारसा कायदा सन १९५६ मध्ये अस्तित्वात आला. त्यामुळे त्या अगोदर मयत झालेल्या व्यक्तिंचे मुलींना वडिलोपार्जित मिळकतीत हिस्सा मिळत नव्हता. जर श्रावण बाळया हे १९५६ नंतर मयत झाले असते असे वादींचे म्हणणे असते तरी भू.संपादनाचे वेळी

वादींनी त्यांचे हिश्श्याबाबत हरकत नोंद करावयास पाहिजे होती. परंतू वादीने भू. संपादनाचे निवाडे जाहीर झाले तेव्हा अथवा त्यानंतरही त्याबाबत कोणताही आक्षेप भूसंपादन अधिका-यांकडे नोंदविल्याचे आढळून आलेले नाही किंवा वादींनी किंवा वादींतर्फे नुकसानभरपाईची रक्कम स्विकारलेचा कोणताही पुरावा दाखल नाही. प्रतिवादींनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरून प्रथमदर्शनी श्रावण बाळया हे १९५६ पूर्वीच मयत झालेचे आढळून येते. त्यामुळे वादींचे लाभात सकृतदर्शनी केस नाही. तसेच, वादींनी भू संपादन होत असता अथवा त्यानंतरही त्यांचा मिळकतीत हक्क आहे अशी हरकत उपस्थित केली नाही. त्यामुळे सोयीचा समतोल देखील त्यांचे बाजूने नाही. म्हणून मुद्दा क्रं.१ व २ चा निष्कर्ष नकारार्थी दिला आहे.

**<u>मुद्दा क्रं.३ बाबत</u>** :-

१३) सिडकोतर्फे अद्याप सर्व भूखंड प्रतिवादींना वितरित करण्यात आलेले नाहीत. जरी काही भूखंड वितरीत झालेले असले तरी वादींचा हक्क सिध्द झाल्यास त्यांना उर्वरित मिळकतीत हिस्सा मिळू शकेल. त्यामुळे वादींचे अपरिमित नुकसान होणार नाही. म्हणून मुद्दा क्रं.३ वरील निष्कर्ष नकारार्थी दिला आहे.

**<u>मुद्दा क्रं.४ बाबत</u>** :-

१४) मुद्दा क्रं.१ ते ३ वरील निष्कर्ष लक्षात घेता वादीचा अर्ज रद्द करणे आवश्यक आहे. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे-

**<u>आदेश</u>**

वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात
येत आहे.

पनवेल
तारीख: ०४/०१/२०१४

(चित्रा हंकारे)
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, पनवेल.